# ‘माणूस झाला सस्ता...’

शोध-संशोधन

– हितेश पोतदार



प्रातिनिधिक छायाचित्र

**नारायण सुर्वे यांची कविता आठवते : ‘मानूस झाला सस्ता, बकरा म्हाग झाला/जिंदगीमध्ये पोरा, पुरा अंधेर झाला/आणि शब्दाला जगवेल असा, कोन हाय दिलवाला?/सबको पैसेने खा डाला! ’ सोबत लगेच श्याम बेनेगलचा ‘आघात’ हा चित्रपट आठवतो. ज्यात एका कामगाराचा कारखान्यात अपघात होतो. कारखान्याच्या मालकाला फोन जातो. मालक चेहऱ्यावरचे निरस भाव तिळमात्रही न बदलता ‘कामगाराला कसलीही कमी पडू नये ह्याची दखल घ्या’ असे निर्देश सुपरवाइजरला देतो. अपघातग्रस्त कामगाराला अपंगत्व येण्याचा धोका वैद्यक दर्शवतात. सुपरवाइजर कामगाराच्या नातेवाइकाला आपले व्हिजिटिंग कार्ड सोपवून ‘कसलीही गरज पडल्यास संपर्क साधा’ असे म्हणून निघून जातो. ह्याला सुपरवायजरचा दयाळूपणा आणि अनुकंपा समजून नातेवाईक हुरळून जातात. ओम पुरीला (कामगार नेत्याच्या भूमिकेत) त्या नातेवाइकांना समजावे लागते की सुपरवाइजर असे म्हणून उपकार करत नाही. हे त्याचे काम आहे.**

**सुर्वे यांच्या कवितेतील ‘माणूस सस्ता झाला’ हे फक्त रूपक नसून वास्तव आहे. ज्याची ग्वाही भारतातील कारखाने किंवा इतर कामाच्या जागांवर होणाऱ्या अपघातांचे आकडे देतात...**

प्रस्तुत लेखात भारतातील औद्योगिक अपघात व कामगार नियमांचा विदे(डेटा)आधारे ऊहापोह करण्याचा प्रयत्न आहे. मूळ विषयाची चर्चा करण्याअगोदर १९४० व १९९०च्या दशकांचा आजच्या परिस्थितीवरील प्रभाव जाणून घेणे महत्त्वाचे ठरते. साधारणतः १९४०च्या दशकाच्या आसपास जगभरात नुकत्याच स्वतंत्र झालेल्या देशांत त्या देशांची अर्थव्यवस्था कशी असावी आणि त्यानुसार तिच्या प्रगतीची गणिते कशी आखली जावीत, ह्याचे अनेक आराखडे मांडण्यात आले. हे विचार फक्त उजव्या आणि डाव्या आर्थिक-राजकीय विचारप्रणालींपुरता मर्यादित न राहता दोन्हीकडच्या विचारांची मिसळ होऊनसुद्धा वर आले. ह्या प्रक्रियेतून मांडण्यात आलेले आराखडे जरी मूलतः वैचारिकदृष्ट्या आणि त्यांच्या अंतिम ध्येयासंबंधित विभिन्न असले तरी त्या सगळ्यांच्या गाभ्याशी एक विचार समान होता. तो म्हणजे औद्योगिक क्षेत्रप्रणीत विकासाचे आराखडे आखले जावेत ह्याचा. त्यानुसार बहुतेक वसाहतोत्तर अविकसित आणि विकसनशील राष्ट्रांनी औद्योगिक क्षेत्रावर विशेष भर देऊन राष्ट्रांच्या विकासाचे आराखडे मांडले. त्यात भारतही अग्रस्थानी होता. त्याचे साक्षीदार नियोजन आयोग व त्यांच्या पंचवार्षिक योजना काय आहेत त्याच्या इतिहासात न जाता, अशा योजनांची उद्दिष्टे काय होती, हे माहीत असणे गरजेचे ठरते. या योजनेनुसार भारतीय अर्थव्यवस्थेत १९८०च्या दशकापर्यंत कमी-अधिक प्रमाणात औद्योगिक क्षेत्राला प्राधान्य देण्यात आले. त्यानुसार कुशल कामगारांची निर्मिती व्हावी म्हणून विविध संस्था निर्माण करण्यात आल्या. ह्या आराखड्यांच्या धोरणानुसार औद्योगिक क्षेत्राची भरभराट होऊन त्यातून आलेले अतिरिक्त उत्पन्न हे कृषिक्षेत्रात वापरले जाऊन विकास साधणे, असा एक ढोबळ विचार होता. त्या औद्योगिक क्षेत्रातून निर्माण झालेल्या मागणीतून सेवाक्षेत्राचाही विकास साधता येईल अशी ही संकल्पना होती.

## कशाला औद्योगिक क्षेत्राची बात?

साहजिकच त्याने औद्योगिक क्षेत्रात कामगारांची मागणी वाढेल असा अंदाज होता; परंतु भारत बहुतांशी कृषिक्षेत्रावर रोजगारनिर्मितीसाठी अवलंबून राहिला. आजही सत्तर टक्क्यांपेक्षा अधिक लोक कृषिक्षेत्रावर अवलंबून आहेत. १९९०च्या दशकात अनेक समीकरणे बदलून सेवाक्षेत्रात व सबंध अर्थव्यवस्थेत लक्षणीय बदल आले. सेवाक्षेत्रात रोजगारनिर्मिती झाली; परंतु ही रोजगारनिर्मिती काही एका सामाजिक-आर्थिक गटापुरतीच मर्यादित राहिली. ज्याला आज आपण नव-मध्यमवर्ग म्हणतो. ह्या नवीन मध्यमवर्गनिर्मितीचा जरी औद्योगिक क्षेत्राशी व त्यातील कामगारांच्या परिस्थितीवर थेट आर्थिक प्रभाव नसला तरी साधारणतः औद्योगिक क्षेत्रातील कामगारांच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष झाले. हा नव-मध्यमवर्ग विविध प्रकारच्या माध्यम क्षेत्रात प्रभावी आहे. ह्या प्रक्रियेत औद्योगिक क्षेत्र व त्यातील कामगार साधारण चर्चाविश्वातून नामशेष झाले.

नुकत्याच झालेल्या शेतकरी आंदोलनांमुळे कृषिक्षेत्राकडे लक्ष वेधले गेले. कृषिक्षेत्र व त्यातील परिस्थितीसुद्धा हवे तेवढे चर्चाविश्व व्यापत नसले तरी अनेक वेळा असे लक्ष विविध कारणांनी वेधले जाते. परंतु औद्योगिक क्षेत्र माध्यमांतून संपूर्ण नाहीसे झाले. कृषिक्षेत्रातील अवस्थेमुळे व त्यातील संकटामुळे ग्रामीण भागातील लोक काम शोधण्याकरिता शहरी भागात स्थलांतर करू लागले होते. स्थलांतराचे प्रमाण १९९०च्या दशकापासून वेगाने वाढू लागले. ह्या स्थलांतरित समूहापैकी बहुतांश समूह हा तुटपुंजे उत्पादन करणाऱ्या अनौपचारिक-असंघटित क्षेत्रात समाविष्ट झाला असला तरी औपचारिक-असंघटित क्षेत्रातील टक्कासुद्धा चढत्याक्रमाने वाढत राहिला आणि वाढत आहे. भारत सरकारच्या उद्योगांच्या वार्षिक सर्वेक्षणानुसार (Annual Survey of Industries, ASI) कामगार समावेशाचा दर प्रति वर्षी ४ टक्क्यांनी वाढत आहे. ह्याचा अर्थ जनमानसातील कारखान्याविषयी असणारा सामान्य समज असा की कारखान्यातील कामगारांची संख्या खालावते आहे; पण वस्तुतः हा समज अत्यंत चुकीचा आहे.

## कामगार अपघाताची आकडेवारी


अनेक शासकीय व बिगरशासकीय अहवालांनुसार औद्योगिक क्षेत्रातील कामगारांची संख्या वाढती आहे; परंतु त्या वाढीसोबत कामगारांची कार्यक्षेत्रातल्या जागेतील परिस्थिती खालावते आहे. १९९०नंतरच्या भारतातील अर्थव्यवस्थेतील 'सुधारणां'मुळे व्यवसाय-मालक धार्जिणी धोरणे व जागतिक वित्त भांडवलाला आकर्षित करण्यासाठी कामगार कायद्याची पायमल्ली होताना दिसते आहे. ह्यात पहिला बळी जातो, तो औद्योगिक क्षेत्रातील कामगारांच्या सामाजिक व कार्यक्षेत्र

सुरक्षेचा. १९९० व २०१४ ह्या देशाच्या आर्थिक-राजकीय पटलावरील मोठ्या दोन तिठ्यानंतर (‘कंजंक्चर’) कामगार कायद्यांत फार मोठे बदल झाले. त्याचा परिणाम म्हणून कामगारांची परिस्थिती खालावत गेली. त्याच्या प्रक्रिया अनेक असल्या तरी जागतिक वित्त भांडवल व सरकारे ह्यांच्या परस्परपूरक संबंधांतून तयार झालेल्या धोरणांच्या परिप्रेक्ष्यातून कामगार बाहेर पडला. त्याचे परिणामसुद्धा अनेक असले तरी ह्या लेखात आपण अगदी वरकरणी दिसून येणाऱ्या कामगारांच्या ठोस परिस्थितीवर म्हणजेच औद्योगिक अपघातांवर लक्ष केंद्रित करणार आहोत.

बाजूच्या स्तंभातील तक्त्यात (तक्ता क्रमांक १) बघितल्यास लक्षात येईल की २०१३ पासून २०१९ पर्यंत कारखान्यांच्या संख्येत तब्बल ५४.६ टक्के एवढी वाढ झालेली दिसते. (२०१३ मध्ये ८७,४९३ वरून २०१९ मध्ये १,९२,७६१ पर्यंत) त्याचप्रमाणे कामगारांच्या संख्येत २०१३च्या सदतीस लाख पासून एक कोटी एक लाखापर्यंत गेल्याचे आढळते. म्हणजेच ही वाढ ६४ टक्के एवढी आहे. ह्याचा अर्थ पाच ते सहा वर्षांच्या कालावधीत आपल्याला दोन्हींच्या संख्येत जवळपास ५० टक्के वाढ होत असल्याचे दिसते आणि ही वाढ अजून वाढत राहण्याची चिन्हे आहेत.

‘महासंचालनालय, कारखाना सल्ला आणि कामगार संस्था’ (DGFASLI) यांच्या अहवालानुसार (२०२२) विविध उद्योगांमध्ये २०२० साली एकूण ३२,४१३ अपघातांची नोंद झाली. परिणामी १,०५० मृत्यू आणि ३,८८२ जखमी झाले (तक्ता २). गुजरात, महाराष्ट्र आणि तमिळनाडू यांसारख्या अधिक औद्योगिक राज्यांमध्ये अधिक मृत्यूची नोंद झाली आहे. एकूण जखमी आणि गैर-प्राणघातक (Non-Fatal) अपघातांच्या (२०११-२०२०) संदर्भात औद्योगिक अपघातांमध्ये घट झाल्याचेही तक्ता दाखवतो.

तथापि, आपण हे लक्षात घेतले पाहिजे की DGFASLIची विदा अंडर-रिपोर्टेड असल्याचे दिसते. हे तीन कारणांसाठी आहे. एक, राज्याचे मुख्य निरीक्षक (DGFASLI) यांच्या प्रत्यक्ष देखरेखीखाली स्थानिक निरीक्षकांच्या मदतीने ही विदा गोळा करण्यात येते. मात्र प्रत्येक ५०० कारखान्यांमागे एकच निरीक्षक आहे आणि सरासरी एका कारखान्याची कामगार क्षमता १० पकडल्यास ५००० कामगारांमागे एक निरीक्षक असा हा हिशेब आहे. त्यामुळे विदा गोळा करण्याबाबत




चिंता निर्माण करावयास जागा आहे. त्याच आकडेवारीनुसार सुरक्षा निरीक्षक, वैद्यकीय निरीक्षक, स्वच्छता निरीक्षक आणि रसायन निरीक्षकांची अंदाजे ५० टक्के पदे भरलेली नाहीत. कर्मचाऱ्यांच्या या कमतरतेमुळे केवळ पुरेसा डेटा गोळा करणे कठीण होत नाही, तर योग्य तपासणी करणेदेखील अशक्य होते. तिसरे, अर्थव्यवस्थेच्या वाढत्या अनौपचारिकीकरणाने आधीच असंख्य एम.एस.एम.ई. म्हणजेच लघु व मध्यम उद्योगसमूहांना औपचारिक क्षेत्राबाहेर ढकलले आहे, ज्याचा जीडीपीच्या ९० टक्के वाटा आहे. परिणामी, सर्व नोंदणीकृत कारखान्यांपैकी केवळ २२ टक्के आणि धोकादायक कारखान्यांपैकी ३५ टक्के तपासले जातात. भारताच्या जीडीपीमध्ये ३३ टक्के वाटा असलेले बहुसंख्य एम.एस.एम.ई. कोणत्याही सुरक्षानियमांच्या अधीन नाहीत. म्हणून ते आपोआपच वगळले जातात.

### अधिकारी संख्या व अंडर-रिपोर्टिंग

DGFASLI ची आकडेवारी दर्शविते की, २०१७ साली एकूण दुखापतींमध्ये अंदाजे १३.४ टक्के आणि २०२१ साली १५.७ टक्के घट झाली. नुसत्या मूळ संख्या बघून आपणास वरकरणी असे दिसून येते की, कारखान्यांतील रोजगार वाढत असूनही दुखापती व मृत्युसंख्येत घट दिसते. पण ही आकडेवारी स्वतंत्रपणे बघितल्यास तसे दिसते. मात्र सुरक्षा/वैद्यकीय/कल्याण अधिकारी यांची संख्या व दुखापती/मृत्यू प्रतिबंधक योजना असलेल्या कारखान्यांच्या संख्या ह्यांना कारखान्यातील रोजगार/कामगार संख्येच्या तुलनेत बघितल्यास सत्य चित्र समोर येते. त्यासाठी मी आकडेवारींवर थोडी प्रक्रिया करत

**एकूण अपघात व त्यांचे प्रकार (२०११ ते २०२०)**

| वर्ष | धोकादायक घटना (Dangerous Occurrences) | घातक दुखापती (Fatal Injuries) | अघातक दुखापती (Non-fatal injuries) | एकूण |
|---|---|---|---|---|
| 2011 | 649 | 1,394 | 28,805 | 30,199 |
| 2012 | 1,310 | 1,317 | 28,700 | 30,017 |
| 2013 | 1,343 | 1,312 | 26,852 | 28,164 |
| 2014 | 1,534 | 1,266 | 25,500 | 26,766 |
| 2015 | 1,091 | 1,107 | 20,257 | 21,364 |
| 2016 | 700 | 1,189 | 5,367 | 6,556 |
| 2017 | 1,382 | 1,084 | 4,866 | 5,950 |
| 2018 | 1,124 | 1,154 | 4,528 | 5,682 |
| 2019 | 1,371 | 1,127 | 3,927 | 5,054 |
| 2020 | 634 | 1,050 | 2,832 | 3,882 |

कामगार संख्येच्या तुलनेत अधिकारी संख्या व दुखापती/मृत्यू प्रतिबंधक योजना असलेल्या कारखान्यांच्या संख्या यांतील सापेक्ष बदल याची आकडेवारी काढली. (अधिक माहितीसाठी पाहा – https://datawrapper.dwcdn.net/zyQ>9g/1/) दोन, कामगार संख्येच्या तुलनेत सापेक्ष बदल (Relative Change with Respect to Employment) सारणी https://datawrapper.dwcdn.net/Rjyom/1/ .)


माझ्या ह्या आकडेवारीवरील प्रक्रियेनुसार कारखान्यांतील कामगारांच्या संख्येत २०१४ व २०१५ ह्या दोन वर्षांत लक्षणीय आणि नाट्यमय बदल दिसून येतात. २०१४ साली कामगारांची संख्या ९८ टक्क्यांनी घटते व २०१५ साली पुन्हा ६७ टक्क्यांनी उसळी घेते. २०१५ नंतर कामगारांची संख्या २०२२ पर्यंत संथ गतीने घटत राहते. ह्याचा अर्थ जर कामगारांची संख्या घटत असेल तर त्या तुलनेत अपघातांची संख्या घटणे विशेष नाही. तरीही सुरक्षा/वैद्यकीय/कल्याण अधिकारी ह्यांच्या संख्येतील बदल अधिक नाट्यमय गतीने DGFASLIची आकडेवारी व त्यांचे अपघात घटणाऱ्या संख्यांवरचे दावे यांतील अंतर दर्शवतात. कामगार संखेच्या तुलनेत अधिकारी संख्येतील सापेक्ष बदलांचा विचार केल्यास दिसून येते की तीनही अधिकारांच्या संख्येत प्रचंड घट झाली. २०२० साली सुरक्षा अधिकारांच्या सापेक्ष बदलात १६.४ टक्के एवढी घट व कल्याण अधिकारांच्या सापेक्ष बदलाच्या टक्केवारीत ६.३४ टक्के घट झाली.

वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या संख्येतील सापेक्ष बदल अधिक आश्चर्यकारक आहेत. कोविड-१९ महामारीच्या काळात वैद्यकीय अधिकाऱ्यांत लक्षणीय वाढ दिसून येते. ती तब्बल २०२० साली २६९ टक्क्यांनी वाढली; परंतु हीच संख्या लगेच पुढच्या वर्षी कामगार संख्येच्या तुलनेत २९० टक्क्यांनी घसरल्याचे दिसून येते. त्याचप्रमाणे सुरक्षा समित्या असलेल्या कारखान्यांची संख्या व साइटवर आपत्कालीन योजना असलेले कारखाने ह्यांच्या कामगार संख्येच्या तुलनेत लक्षणीय घट होत असल्याचे दिसून येते.

थोडक्यात, कामगाराची संख्या विचारात घेता असे दिसून येते की, अधिकारी/निरीक्षक संख्या सतत कमी होत असून एक अधिकारी/निरीक्षक यांच्यामागील कारखान्यांची संख्या वाढत जाऊन त्यांच्यावर भार वाढत आहे. ह्याचा परिणाम अपघात संख्येत अंडर-रिपोर्टिंगमध्ये जाणवू शकतो. तसेच सुरक्षा समित्या असलेले व साइटवर आपत्कालीन योजना असलेले कारखाने ह्यांच्या संख्येतील घट बघता शासकीय यंत्रणेतील हलगर्जी व धोरण-लकवा उघडपणे दिसून येतो. त्यानुसार ह्या धोरण ठप्पपणाचे संकेत सार्वजनिक गुंतवणुकीतील घट किंवा व्यापक आर्थिक समस्यांशी संबंधित असल्याचे ठळकपणे दिसते.

हे वास्तव असूनही केवळ २,५६३ लोकांना दोषी ठरवण्यात आले. फॅक्टरीज कायद्याचे उल्लंघन केल्याबद्दल फक्त १० लोकांना तुरुंगात टाकण्यात आले आणि केवळ तीन कोटी रुपयांची भरपाई मिळाली. नियोक्ते /कंत्राटदार सतत अपघातांची जबाबदारी टाळण्याचे प्रयत्न करतात. ते क्वचितच कायदेशीर कारवाईच्या भीतीने सुरक्षा निरीक्षक किंवा कोणत्याही इतर सरकारी अधिकाऱ्याकडे अपघाताच्या घटनांची तक्रार करतात. ते जखमी कामगारांना सरकारी सुविधांपेक्षा खाजगी रुग्णालयात दाखल करण्यास प्राधान्य






देतात व अपुरी भरपाई देतात.

**औद्योगिक अपघात एक संरचनात्मक समस्या**

भारतामध्ये औद्योगिक सुरक्षा आणि आरोग्यासेवा यांमध्येदेखील संरचनात्मक समस्या आहेत. ज्यामुळे कामाच्या ठिकाणी मोठ्या प्रमाणात अपघात होतात आणि कामगारांचे आरोग्य धोक्यात येते. कायदे आणि नियमांची अनेकदा काटेकोरपणे अंमलबजावणी केली जात नाही. अपुरे लक्ष दिला जाणारा आणखी एक पैलू म्हणजे आरोग्य. बहुसंख्य कामगारांना पुरेसे आरोग्य संरक्षण नाही. (तक्ता ४) पैशांची बचत करण्यासाठी कामगारांचे आरोग्य व सुरक्षितता यांचा सर्वात पहिला बळी दिला जातो आणि हे दुःखद आहे. वित्तीय काटकसरीच्या धोरणाने पहिला बळी जातो, तो कामगारांचाच.

औद्योगिक अपघातांविषयी देशात किंवा कुठल्याही राज्यात एक स्वतंत्र सर्वसमावेशक असा कायदा नाही. निरीक्षणविषयक कायदे वेगळे. त्यातही काही संबंधित कारखान्यांविषयीचे कायदे वेगळे. जसे रासायनिक प्रक्रिया करणारे कारखाने. अपघातांविषयी सूचना करणारे वेगळे. आणि अपघातानंतर पुढील प्रक्रिया स्पष्ट करणारे वेगळे. असेच चित्र संबंधित संस्थांच्या पातळीवर देखील दिसते. DGFASLI हयात असले तरी त्यांची भूमिका ही निरीक्षण व धोरण देखरेखीपुरता मर्यादित राहते.

कामगारांसाठी अपघातपश्चात विमा व उपचारासंबंधित गोष्टींसाठी ESIC म्हणजेच 'कर्मचारी राज्य बीमा निगम' महत्त्वाची भूमिका निभावते. परंतु ESIC व इतर संस्था यांमध्ये कुठलाही थेट प्रशासकीय दुवा दिसून येत नाही. एकच घटक दुवा बनून उरतो आणि तो म्हणजे कारखाना व त्यांचे मालक. कुठल्याही सुदृढ बुद्धीस थेट लक्षात येईल की कारखाने व त्यांचे मालक ह्यांच्यावर विमा व अपघात उपचारांसाठी अवलंबून राहणे मूर्खपणाचे ठरेल. आता ESIC व इतर संबंधित संस्था ह्यांच्याविषयी व त्यांतील धोरण–लकवे, ह्यावर एक वेगळा लेख होईल. ह्या लेखापुरता एक ठळक बाब नक्की नोंदवता येईल की भारतात औद्योगिक क्षेत्र व त्यातील कामगार ह्यांच्याविषयी कायदे बनवताना धोरणकर्त्यांनी कारखाना मालकांना कामगारांविषयी ठोस जबाबदाऱ्या न देता उलट सामाजिक सुरक्षेसंबंधित धोरणांचा फायदा घेण्यासाठी मालकवर्गाला शब्दशा 'अडत्या' म्हणून स्थान दिले आहे. म्हणजे मालक कामगारांच्या अपघात विमा किंवा भविष्य निर्वाह निधीमध्ये (पीएफ) दर महिन्याला किती शिस्तीने गुंतवणूक करतो नि तिचे फायदे घेण्यासाठी काय भूमिका निभावतो ह्यावर कामगारांचे सर्वस्वी संरक्षण अवलंबून




राहते. हे लक्षात घेता असे म्हणणे अतिशयोक्त ठरणार नाही की भांडवलदार व शासन ह्यांच्यातील संबंध उघडपणे कायद्यांद्वारे दिसून येतात व दोघे आपली कामगारांप्रति असलेली जबाबदारी कशा प्रकारे टाळतात हेही उघड होते.

**कामगार कायदे व बेरोजगारी सलग्न आर्थिक वाढ**

कामगार कायद्याची पायमल्ली होणे हा भारतात अपवाद नसून ही सर्रास दैनंदिन पद्धत आहे. 'लेबर राइट्स इंडेक्स' ह्या संस्थेच्या अहवालानुसार कामगारांचे अधिकारपालन व ते अबाधित ठेवण्यात भारताचा क्रमांक ६७वा आहे. समान मोबदला कायदा, १९७६; कारखाना कायदा, १९४८; कंत्राटी कामगार (नियमन आणि निर्मूलन) कायदा, १९७०; व पेमेंट ऑफ ग्रॅच्युइटी कायदा, १९७२ – ह्या कायद्यांच्या अंमलबजावणीची व त्यांद्वारे दाखल करण्यात आलेल्या





जिवावर बेतणारे श्रम

विवादाचे निरसन करण्यात भारत सरकार व इतर राज्य सरकारे सपशेल अपयशी ठरली आहेत, हेही हा अहवाल नोंदवतो.

भारतातील कामगार कायद्यांच्या अंतर्गत दाखल केलेल्या खटल्यांच्या निर्वाणाचा दरसुद्धा इतर विकसनशील देशांच्या तुलनेत खूप कमी आहे. हा १५ ते २२ टक्क्यांदरम्यान रेंगाळत राहतो. हा दर गुजरात पाठोपाठ महाराष्ट्र ह्या दोन राज्यांसाठी अधिक कमी आहे आणि ही दोन राज्ये अपघात व दुखापती संख्येत अग्रस्थानी आहेत. महाराष्ट्राच्या बाबतीत २०२१ साली एकूण फॅक्टरीज कायद्याअंतर्गत दाखल केलेल्या खटल्यांची एकूण संख्या २४२९ होती. त्यातील फक्त ८३ खटल्यांवर निवडा होऊ शकला आहे. विशेष म्हणजे महाराष्ट्रासाठी निवाड्यांचा आकडा २०१४ पासून अधिक गतीने खाली गेलेला आढळतो आणि हाच आकडा गुजरात संदर्भात २००४ पासून वेगाने घसरल्याचे दिसून येते. ह्या आकडेवारीनुसार विशिष्ट विचारसरणीची सरकारे व त्यांचे भांडवली संबंध ह्यांतील नात्यांविषयी प्रासंगिक अनुमान लावता येऊ शकते. अनियंत्रित औद्योगिकीकरण, उपलब्ध कामगारवर्गांचे वाईट व्यवस्थापन आणि जोडीला बेरोजगारी सलग्न आर्थिक वाढ (जॉबलेस ग्रोथ) ह्या प्रक्रियांद्वारे परिस्थिती अजून खालावते.

'विकसित भारता'त आर्थिक वाढीला अधिक महत्त्व दिले असूनही आर्थिक वाढीची आकडे काही फार वेगळे नाहीत. भारतातील एकमेव 'नियतकालिक श्रम शक्ती सर्वेक्षण' (Periodic Labour Force Surveys) यांनुसार कामास तयार असणाऱ्या वर्गाची संख्या २०१७ साली ४९.५५ टक्के होती व ती वाढून २०२३ साली ५९.५२ टक्के इतकी झाली आहे. ह्याच सर्वेक्षणानुसार बेरोजगारांची संख्या घटल्याचे दिसते. मात्र अनेक तज्ज्ञांच्या मतानुसार राष्ट्रीय सांख्यिकी सर्वेक्षण कार्यालयाने (NSSO) ह्या सर्वेक्षणाच्या पद्धतींमध्ये अनेक बदल केले आहेत. ज्यामुळे बेरोजगारीच्या आकड्यांची विश्वासार्हता कमी होते. परंतु अजीम प्रेमजी विद्यापीठाच्या, सेंटर ऑफ सेस्टेनेबल एम्प्लॉयमेंटच्या 'स्टेट ऑफ वर्किंग इंडिया' ह्या अहवालानुसार जीडीपीच्या

**Top 10 States with hazardous process factories and workers working in it**

| State/UT | Factories | Workers |
|---|---|---|
| Gujarat | 11,151 | 528,797 |
| Maharashtra | 5,273 | 605,508 |
| Uttar Pradesh | 3,887 | 401,609 |
| Telangana | 2,300 | 199,953 |
| Kerala | 2,088 | 33,523 |
| Andhra Pradesh | 1,574 | 159,543 |
| Madhya Pradesh | 1,485 | 97,018 |
| Karnataka | 1,404 | 320,046 |
| Haryana | 1,398 | 48,544 |
| Tamil Nadu | 1,092 | 119,494 |

Table: Hitesh Potdar • Source: The Directorate General, Factory Advice and Labour Institutes (DGFASLI) • Created with Datawrapper

तुलनेत रोजगारांत लक्षणीय वाढ दिसत नाही. उलट आर्थिक वाढीचा रोजगारनिर्मितीवरील परिणाम मोठ्या कालावधीसाठी नकारात्मक दिसून येतो.

थोडक्यात, सरकारी आर्थिक धोरणे, संबंधित सरकारांची राजकीय विचारसरणी व त्यांचे भांडवली संबंध ह्यातून आर्थिक वाढीचे व 'विकसित भारता'ची स्वप्ने दाखविली जात असली तरी त्या वाढीचा एकूण सामान्य माणसांसाठी थेट फायदा दिसून येत नाही. बेरोजगार सलग्न आर्थिक वाढीसोबतच हयात असलेल्या कामगार कायद्यांची पायमल्ली, त्यांची परिणामकारकता कमी करण्याचे प्रयत्न व सामाजिक सुरक्षेकडील दुर्लक्ष ह्यांचा एकत्रित परिणाम हा भविष्यातील आर्थिक संकटांची नांदी म्हटल्यास अतिशयोक्ती ठरू नये.

**राजकीय–अर्थव्यवस्थेच्या (Political Economy) दृष्टिकोनातून औद्योगिक अपघात व 'माणूस/मानव' ही संकल्पना :**

कुठलीही अर्थव्यवस्था 'सुरळीत' चालावी म्हणून उत्पादन 'सतत' सुरू ठेवणे महत्त्वाचे आहे, असा सामान्य समज आहे. त्या उत्पादनासाठी तीन मूलभूत गोष्टींची गरज असते – भांडवल, जमीन आणि श्रमशक्ती. (सुलभ शब्द कामगारांची) भांडवल आणि जमीन कशा प्रकारे उपलब्ध होतात, ह्याची थोडीफार कल्पना सामाजिक विज्ञानाचे सामान्य ज्ञान असणाऱ्याला असते. उत्पादन 'सतत' सुरू राहावे म्हणून ह्या तिन्ही गोष्टींचे पुनरुत्पादन होणे गरजेचे असते. अर्थव्यवस्थेत व तिच्या अभ्यासात भांडवल आणि जमीन ह्यांचे पुनरुत्पादन कसे होते, हे सखोलपणे चर्चिले गेले आहे व जाते. परंतु एक मुद्दा इथे खूप दुर्लक्षित आहे तो म्हणजे कामगारांच्या पुनरुत्पादनाचा. भांडवल आणि जमीन आहे, पण कामगार नाही. अशा परिस्थितीत उत्पादनप्रक्रिया चालू राहू शकते का? आज कामगार उत्पादनप्रक्रियेत आपली श्रमशक्ती व्यस्त करून आपला कामाचा दिवस संपवतो. स्त्रीवादी अर्थतज्ज्ञ तिथी भट्टाचार्य प्रश्न विचारतात की, दुसऱ्या दिवशी तो पुन्हा कारखान्याच्या गेटवर कसा पोहोचतो? त्या प्रक्रिया कुठल्या ज्या त्याला रोज सकाळी कामावर जाण्यासाठी पुन्हा तयार करतात? म्हणजेच श्रमशक्तीचे/कामगारांचे पुनरुत्पादन कसे होते?

वरील विश्लेषण ठळकपणे दर्शवते की 'कामगार' किंवा 'श्रमशक्ती' हा उत्पादनप्रक्रियेचा एक महत्त्वाचा व अविभाज्य भाग आहे. तो फक्त उत्पादनप्रक्रियेसाठीच नाही तर उद्योजकांना किंवा भांडवदारांना उद्योगातून होणाऱ्या नफानिर्मितीसाठीसुद्धा आहे. भांडवलशाहीत ज्या वरकडमूल्याच्या प्राप्तीतून नफानिर्मिती होते, ती कामगार शोषण झाल्याशिवाय शक्य नाही, हे उघड आहे. हा नफाप्राप्तीचा दर सतत वाढत राहावा म्हणून वरकडमूल्या व्यतिरिक्त अनेक मार्ग भांडवलदार शोधत असतात. त्यातील काही निवडक प्रकार : एक, नवीन तंत्रज्ञानाचा उपयोग. दोन, गुंतवणूक–नियमन करून भांडवलाचा खर्च कमी करणे. तीन, शासनाकडून विविध सवलती प्राप्त करणे. चार, भांडवलशाहीपूर्व संबंधावर आधारित कामगार–संबंधाचा वापर, म्हणजेच वेठबिगारी, जाती–लिंगाधारित श्रमविभागणी. ह्यात मानव केंद्रस्थानी आहे. म्हणजेच मानवाच्या श्रमशक्तीशिवाय नफ्याचा दर सतत वाढत ठेवणे अशक्य आहे. असे असले तरी औद्योगिक क्षेत्रातील अपघात दर्शवतात की भांडवलदार व त्यांचे संरक्षक बनलेल्या शासकीय व्यवस्था मानवी श्रमशक्तीविषयी किती गाफील आहेत. सद्य:व्यवस्थेतील हा एक ठळक विरोधाभास आहे.

कामगारांची पुनर्निर्मिती ही भांडवली उत्पादनासाठी फक्त एक अट नव्हे, तर पूर्व–शर्तसुद्धा (कंडिशन आणि प्री–कंडिशन) आहे. त्यामुळे कामगार इजा व मृत्यू ही सद्य आर्थिक प्रणालीसाठीसुद्धा शाश्वत नाही. अशा इजा व मृत्यू भांडवली उत्पादनासाठीसुद्धा हानिकारक आहेत. त्यामुळे हा युक्तिवाद फक्त समाजवादी किंवा साम्यवादी उरत नसून तो भांडवलशाहीलासुद्धा तितकाच लागू होतो. दुर्दैवाने बेरोजगारीतून निर्माण होणारी कामगारांची राखीव फौज व शासकीय यंत्रणेचे ह्याकडील दुर्लक्ष भांडवलदार–मालकांना कामगारांविषयक असणाऱ्या जबाबदारीपासून मुक्त करतात. याच कारणास्तव माणूस/व्यक्ती ह्या आर्थिक चक्रातून/समीकरणातून बाहेर फेकल्या जातात. कामगारांची किंमत शून्य होते. कामगार वापरून फेकले जाणारे (डिस्पोजेबल) एक घटक बनतात. नारायण सुर्वे म्हणतात तसे, माणूस सस्ता होतो!

––

**(लेखक किंग्ज कॉलेज, लंडन (स्ट्रँड कॅम्पस) येथे डिपार्टमेंट ऑफ इंटरनॅशनल डेव्हलपमेंटमध्ये पीच.डी. स्कॉलर आहेत. संपर्क** : hitesh.potdar@kcl.ac.uk**)**

**संदर्भसूची** :

१. ए.एस.आय.चा (ASI) अहवाल कारखाने कायदा, १९४८ व बिडी आणि सिगार कामगार (रोजगाराच्या अटी) अधिनियम, १९६६ नुसार उद्योग ह्या व्यापक संज्ञेखाली 'कारखान्या'ची व्याख्या करतो. त्यानुसार दिलेली आकडेवारी फक्त 'कारखाने'मधील कामगारांची संख्या दर्शवते.

२. Loksabha unstarred question no. 2984, dated on 07.08.2023.

❋ ❋ ❋